


सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
पोलीस उप आयुक्त(अभियान),
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१
दूरध्वनी क्र. ०२२-२२६६५८१८
Email- cp.mum.dcpops@mahapolice.gov.in

दिनांक : ०४/०४/२०२६

# प्रेस नोट

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशान्वये व मा. पोलीस सह आयुक्त (का. व सु.), मुंबई यांच्या देखरेखीखाली बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये दर शनिवारी तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात येते. आज दिनांक ०४/०४/२०२६ रोजी सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला व जेष्ठ नागरीक यांच्याकरीता तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर आयोजित तक्रार निवारण दिनाच्यावेळी पोलीस ठाण्यात दाखल दखलपात्र व अदखलपात्र गुन्हयातील फिर्यादी तसेच तक्रार अर्जामधील अर्जदार असे एकुण ९३१ तक्रारदार हजर होते. त्यापैकी ४२५ महिला तक्रारदार व १३५ जेष्ठ नागरीक हजर होते. पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व इतर अधिकारी यांच्याकडून त्यांच्या तक्रारीचे निरसन करण्यात आले. सदरवेळी विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त हे हजर होते. तसेच प्रादेशिक विभागांचे अपर पोलीस आयुक्त व परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी भेटी देवून मार्गदर्शन केले.

* * *